दैनिक
# आकर्षण
वर्धापन दिन
संपादक : विजय सांगळे
वर्ष ५ । अंक ९ । बुधवार २३ सप्टेंबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322





०१) नंदनवन मित्र मंडळ युगात मंडळी जिवंत देखावा ०२) समझोता तरुण मंडळ नाथजी का आखाडा देखावा ०३) वीरराजे मित्र मंडळ बेटी बचाव देखावा.







०४) शिववरद प्रतिष्टान शिवराज्यभिषेक देखावा ०५) श्री कपिलेश्वर मित्र मंडळ मिशन भेसळ मुक्त भारत ०७) भिगार येथील साईबाबा बहुउदेशीय मंडळ ने गोहत्या बंदी देखावा.
(सर्व छायाचित्र – राजू खरपुडे )



भिंगार येथील ब्राह्मण गल्ली येथे श्री देशमुख गणपती देवस्थान ट्रस्टच्या मानाच्या गणपतीची आरती करून विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ करताना पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन समवेत समीर देशमुख, भाऊ कर्डिल आदी उपस्थित होते.

## स्थायी समिती सभेत ३३ रस्त्यांसह विविध विकासकामांना मंजुरी

**३०० कोटींच्या रस्ते विकासासाठी प्रकल्प अहवाल । गैरहजर अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे सभापती पै. सुभाष लोंढे यांचे आदेश । नगरसेवकांच्या कामांना प्राधान्य द्या; गणेश विसर्जन मार्ग, कचरा डेपो, नालेसफाई, मोकाट कुत्र्यांवरून अधिकाऱ्यांना धारेवर धरले**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सभापती पैलवान सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेत शहरातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा होऊन विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत शहरातील नवीन ३३ रस्त्यांच्या विकासकामांसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता व्यवस्थापन सल्लागार संस्था नियुक्त करण्यास मंजुरी देण्यात आली. या रस्ते विकासासाठी सुमारे ३०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

सभेला माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सदस्य मनोज कोतकर, सुरेश बनसोडे, आकाश कातोरे, सोनाबाई शिंदे, संध्या पवार, मीनाताई चोपडा, गंभीर, हरप्रीत कौर, पूर्णिमा गव्हाळे, सुनिता गेणाप्पा, सेहनाज शेख, नगरसेवक मेहर लहारे आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला स्थायी समिती सभापती व सदस्यांनी विविध विषयांवर चर्चा करून विषयांना मंजुरी दिली. यावेळी सभापती पै. सुभाष लोंढे यांनी अधिकारी ठराविक लोकांचीच कामे करीत असल्याची चर्चा असल्याचे सांगत, नव्याने निवडून आलेल्या सदस्यांच्या कामांनाही प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. नगरसेवकांचा मान-सन्मान राखून त्यांनी सांगितलेली कामे तातडीने मार्गी लावावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर विसर्जन मार्गाचे नियोजन करून नागरिकांना त्याची माहिती द्यावी, आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिम विसर्जन कुंडांची निर्मिती करावी, तसेच नेप्ती नाका येथील बारवेची स्वच्छता करण्याचे निर्देश सभापतींनी दिले. सभेला गैरहजर राहिलेल्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेशही त्यांनी दिले.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत नवीन ३३ रस्त्यांच्या कामांसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याचा विषय सभेत मांडण्यात आला. यावेळी पारखे यांनी सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक असल्याचे सांगितले. प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी व्यवस्थापन सल्लागार संस्था नियुक्त करण्याचा हा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी या रस्त्यांपैकी किती रस्त्यांवर अतिक्रमणे आहेत आणि रस्ते करताना कोणत्या अडचणी येऊ शकतात, अशी विचारणा केली. त्यावर पारखे यांनी अनेक रस्त्यांवर अतिक्रमणे असल्याचे सांगितले. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर अतिक्रमणे काढण्यात येतात, अशी माहिती त्यांनी दिली.

यावर बाबासाहेब वाकळे, सुरेश बनसोडे आणि सभापती पै. सुभाष लोंढे यांनी रस्त्यांच्या प्रकल्प अहवालात पाण्याच्या लाईन, विद्युत खांब, तारा, अतिक्रमणे आदींची सविस्तर माहिती असणे आवश्यक असल्याचे सांगितले. ही माहिती आधीच अहवालात आल्यास अतिक्रमणे वेळेत हटविता येतील आणि प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर अडचणी निर्माण होणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

पारखे यांनी संबंधित कंपनी सर्वेक्षण करून अहवाल तयार करेल. त्यानंतर राज्य शासनाकडून तांत्रिक मंजुरी घेण्यात येईल. निधी मंजूर झाल्यानंतर निविदा प्रक्रिया, कामावर नियंत्रण, देयके आदी कामे संबंधित एजन्सी करेल, अशी माहिती दिली. यावर सभापतींनी परिपूर्ण व सर्व बाबींचा समावेश असलेला अहवाल तयार करण्याचे निर्देश देत विषयाला मंजुरी दिली. रस्ता पॅचिंगच्या सुधारित दराच्या विषयावरही सभेत चर्चा झाली. पारखे यांनी सांगितले की, रस्ता पॅचिंगची निविदा प्रक्रिया झालेली आहे. मात्र, डांबराचे

■ पान ४ वर

## माळीवाडा तरुण मंडळाच्या वटसावित्री देखाव्याचे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उद्घाटन

**गणेशोत्सवातून संस्कृती व परंपरांचे जतन होणे गरजेचे : आमदार संग्राम जगताप**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माळीवाडा तरुण मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेल्या वटसावित्री देखाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. भारतीय संस्कृतीतील वटसावित्री व्रत, सावित्री-सत्यवानाची कथा, कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व तसेच महिलांच्या श्रद्धा आणि परंपरेचा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक आणि सांस्कृतिक विषय समाजासमोर मांडण्याचा मंडळाचा प्रयत्न असून, देखाव्याची मांडणी नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. उद्घाटनप्रसंगी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ उत्सव नसून आपल्या संस्कृतीचा, परंपरांचा आणि सामाजिक एकतेचा उत्सव आहे. गणेश मंडळांनी देखाव्यांच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक संदेश देण्याची परंपरा कायम ठेवणे गरजेचे आहे. माळीवाडा तरुण मंडळाने वटसावित्रीचा विषय घेऊन भारतीय संस्कृतीतील एका महत्त्वपूर्ण परंपरेचे दर्शन घडविले आहे. आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये नवीन पिढीला आपल्या परंपरा आणि संस्कृतीची माहिती व्हावी, यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. सावित्री-सत्यवानाची कथा निष्ठा, समर्पण आणि संकटांवर मात करण्याची प्रेरणा देणारी असून, हा विषय देखाव्याच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम मंडळाने केले आहे.

ते पुढे म्हणाले की, गणेशोत्सव साजरा करताना उत्साहासोबत सामाजिक जबाबदारीही महत्त्वाची आहे. तरुणांनी एकत्र येऊन धार्मिक उत्सवाला सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूप देण्यासाठी पुढाकार घ्यावा. विविध सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि जनजागृतीच्या माध्यमातून गणेशोत्सवाचा सकारात्मक प्रभाव समाजावर निर्माण होऊ शकतो. माळीवाडा तरुण मंडळाने उभारलेला वटसावित्रीचा देखावा आपल्या संस्कृतीतील मूल्यांची आठवण करून देणारा आहे. अशा उपक्रमांमुळे आपल्या परंपरांचे जतन होण्यास मदत होते. मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन करून आगामी उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

मंडळाचे अध्यक्ष निलेश खरपुडे म्हणाले की, माळीवाडा तरुण मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सवात विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. यंदा वटसावित्रीचा देखावा साकारताना आपल्या भारतीय संस्कृतीतील परंपरा आणि त्यामागील भावना नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. देखावा उभारण्यासाठी मंडळातील कार्यकर्त्यांनी अनेक दिवस मेहनत घेतली. गणेशोत्सव हा सर्व समाजाला एकत्र आणणारा उत्सव असून, त्यातून सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. नागरिकांनी

■ पान ४ वर

## खाकी वर्दीतील संवेदनशीलता! कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांनी करजगाव येथे विद्यार्थ्यांशी साधला थेट संवाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील करजगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक () संजय येनपुरे () यांनी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी अत्यंत आपुलकीचा, प्रेरणादायी आणि थेट संवाद साधला. विद्यार्थी जीवनात नियमावलीचा अवलंब केल्यास चांगला माणूस घडतो - आयजी संजय येनपुरे आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना संजय येनपुरे म्हणाले, ''सुजान नागरिक आणि एक चांगला माणूस घडण्यासाठी विद्यार्थी जीवनातच नियमावलीचा (शिस्तीचा) अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात स्वतः ची नियमावली तयार करून दररोज काय अभ्यास करायचा आणि भविष्यात आपल्याला काय व्हायचे आहे, याचे नियोजन केले पाहिजे. हाच आपला रोजचा दिनक्रम असायला हवा.

ते पुढे म्हणाले, 'मानवी जीवन हे एकदाच मिळते; त्यामुळे भविष्याचा योग्य वेध घेऊन आपले कार्य करत राहा. आजच्या डिजिटल आणि एआय () तंत्रज्ञानाच्या जमान्यात मोबाईलचा वापर करताना अत्यंत काळजी घेणे गरजेचे आहे. अभ्यासात व्यत्यय येत असेल, तर मोबाईलपासून निश्चित अंतरावर राहा.'

आपले ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी क्रिकेट विश्वातील सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी या दोन मित्रांचे उदाहरण दिले. सचिन तेंडुलकर हा सतत ध्येयवादी आणि शिस्तप्रिय राहिल्याने त्याने भारतरत्न पुरस्कारापर्यंत मजल मारली, असे सांगत त्यांनी ध्येयावर निष्ठा ठेवण्याचा मोलाचा संदेश दिला. तसेच, जागतिक समीकरणांवर भाष्य करत आंतरराष्ट्रीय स्तरावरील घडामोडीं मुळे तिसऱ्या महायुद्धाची निर्माण होत असलेली भीतीही त्यांनी व्यक्त केली.

''महापुरुषांनी आपल्या जीवनमार्गावर चालताना केलेल्या महान कार्यामुळे ते आज अमर झाले आहेत. त्यांच्या विचारांचे आचरण करा; भविष्यात नक्कीच



एक उत्तम व्यक्तिमत्त्व घडण्यासोबतच माझ्यासारख्या उच्च पदावर तुम्ही कार्यरत व्हाल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

व्यासपीठ सोडून थेट विद्यार्थ्यांच्या रांगेत:

कार्यक्रमादरम्यान संजय येनपुरे यांनी औपचारिकतेच्या भिंती बाजूला सारल्या. व्यासपीठावरून खाली उतरून ते थेट जमिनीवर बसलेल्या विद्यार्थ्यांच्या रांगेत जाऊन उभे राहिले आणि मुलांशी थेट गप्पा मारल्या. खाकी वर्दीतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा हा साधेपणा

■ पान ४ वर

## खून करून पसार झालेला आरोपी कल्याणमधून जेरबंद । स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथे भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या तरुणावर लोखंडी कत्तीने वार करून त्याचा खून केल्यानंतर पसार झालेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कल्याण रेल्वे स्टेशन परिसरातून ताब्यात घेतले. हरीष गुलाब काळे (वय ३०, रा. पिंपळगाव कौडा, ता. नगर) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. २३ सप्टेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९



सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास पिंपळगाव कौडा येथे हरीष काळे याच्या राहत्या घरी भांडण सुरू होते. हे भांडण सोडविण्यासाठी फिर्यादी विक्रम रोहिदास भोसले (वय ४०) आणि त्यांचा भाऊ किरण रोहिदास भोसले तेथे गेले होते. त्यावेळी भांडण सोडविण्याच्या कारणावरून हरीष काळे याने किरण भोसले यांच्या तोंडावर, छातीवर आणि पोटावर लोखंडी कत्तीने वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या किरण भोसले यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर हरीष काळे पसार झाला होता. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ३५२ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### आयत्या सजावटीपेक्षा निर्मितीच्या आनंदातच खरे सुख! -शिवव्याख्याता ओंकार व्यवहारे



अहिल्यानगर - महालक्ष्मीच्या आगमनानिमित्त घराघरांत आकर्षक सजावट केली जाते. मात्र, केवळ बाजारातून सजावटीच्या वस्तू आणून घर सजविण्यापेक्षा स्वतःच्या कल्पनेतून, श्रमातून आणि सर्जनशीलतेतून सजावट साकारण्याचा आनंद काही औरच असतो. याच विचारातून ओंकार बाबासाहेब व्यवहारे यांच्या घरी यंदाची महालक्ष्मी सजावट साकारण्यात आली आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रसिद्ध अभंगातील ''राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली, ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या!'' या ओळींना यंदाच्या सजावटीचा मध्यवर्ती विचार करण्यात आला आहे. भौतिक वैभवापेक्षा समाधानातच खरे सुख दडलेले असते, हा साधा पण जीवनाला दिशा देणारा विचार या सजावटीतून मांडण्यात आला आहे. विशेष म्हणजे ही संपूर्ण सजावट पर्यावरणपूरक पद्धतीने साकारण्यात आली आहे. काऊ (बोरू), पुष्टा, चुना, वाळलेले गवत यांसारख्या नैसर्गिक साधनांचा वापर करून सजावटीला आकार देण्यात आला आहे. भिंतींवर पारंपरिक लोककलेच्या शैलीतील चित्रे, ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारे आकृतिबंध आणि विविध कलात्मक रचना साकारण्यात आल्या आहेत. त्यामुळे सजावट केवळ आकर्षक न राहता महाराष्ट्राच्या लोकपरंपरा, ग्रामीण संस्कृती आणि निसर्गाशी असलेले नाते अधोरेखित करणारी ठरते. या सजावटीमागील आणखी एक महत्त्वाचा विचार म्हणजे 'निर्मितीचा आनंद'. आजच्या काळात कोणतीही सजावट बाजारातून सहज उपलब्ध होते. काही क्षणांत तयार वस्तू विकत घेऊन घर सजवता येते. मात्र, एखादी कलाकृती स्वतःच्या कल्पनेतून आणि श्रमातून निर्माण करताना मिळणारे समाधान वेगळेच असते.''आयत्या केलेल्या सजावटीत सुख शोधण्यापेक्षा ती सजावट घडविण्याच्या प्रक्रियेतच खरा आनंद आहे,'' असा विचार या उपक्रमातून मांडला जातो.ओंकार बाबासाहेब व्यवहारे हे शिवचरित्र व्याख्याते असून वयाच्या दहाव्या वर्षापासून ते व्याख्याने देत आहेत. वयाच्या तेविसाव्या वर्षीही इतिहास, संस्कृती, कला आणि सर्जनशीलतेशी असलेली त्यांची नाळ कायम आहे. व्याख्यानकलेसोबतच विविध कलात्मक उपक्रमांमध्ये त्यांना असलेली रुची या सजावटीतूनही प्रकर्षाने दिसून येते. त्यांच्या मते, छंद ही केवळ विरंगुळ्याची साधने नसून व्यक्तिमत्त्व घडविणारी माध्यमे आहेत. विशेषतः आजच्या डिजिटल युगात स्वतःच्या हाताने काहीतरी निर्माण करण्याची सवय मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये रुजणे गरजेचे आहे. चित्र काढणे, हस्तकला करणे, सजावट करणे किंवा कोणतीही सर्जनशील कृती करणे यामुळे कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि 'क्रिएटिव्ह माइंड'ची पायाभरणी होते.

### कृषी कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी राजेश तुंबारे यांची बिनविरोध निवड

अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्हा कृषी विभाग कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी राजेश तुंबारे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सर्व संचालकांच्या वतीने मावळते चेअरमन मोतीराम रहाणे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.याप्रसंगी व्हाईस चेअरमन उज्वला शेळके संचालक अनिलकुमार शेजुळ,संदीप गायकवाड, संतोष सुरवसे ,गंगाराम ढोले,गणेश जगदाळे,विश्वास तोरडमल,अल्ताफ शेख,संजय सोनवणे, जयश्री कुटे ,सुखदेव जमधडे ,विजय सोमवंशी,गोरक्षनाथ पठाडे, नितीन चौरे, कैलास बुंदिले, सार्थक दहिवाले. आदी उपस्थित होते.नूतन चेअरमन तुंबारे यांच्या नावाची सूचना संचालक अनिल कुमार शेजुळ यांनी केली त्याला अनुमोदक संचालक गणेश जगदाळे यांनी दिले निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नितीन नगरे यांनी काम पाहिले . यावेळी सत्काराला उत्तर देताना श्री. राजेश तुंबारे. म्हणाले की कृषी कर्मचारी ही संस्था शेतकऱ्यांच्या सेवा करणाऱ्या कृषी कर्मचाऱ्यांची संस्था आहे आपण सर्व शेतकऱ्यांची मुल आहोत . कृषी विभागात काम करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची ही संस्था आहे. अशा संस्थेत मला सेवा करण्याची संधी सर्व संचालकांनी मला दिली आहे.

# पद्मशाली सोशल फाउंडेशनच्या निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**४५० स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग; ३० सप्टेंबरला होणार बक्षीस वितरण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विनामूल्य निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अहिल्यानगर शहरातील विविध शाळांमधील तसेच शहराच्या विविध भागांतून आलेल्या सुमारे ४५० स्पर्धकांनी या निबंध स्पर्धेत सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला वाव मिळावा, तसेच गणेशोत्सवाच्या सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय पैलूंवर विचारमंथन व्हावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

इयत्ता ५वी ते ७वी तसेच इयत्ता ८वी ते १०वी या दोन गटांमध्ये मिळून सुमारे ३७० स्पर्धकांनी सहभाग घेतला. तर खुल्या गटातील स्पर्धेत सुमारे ८० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. अशा प्रकारे एकूण ४५० स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेत आपल्या लेखनकौशल्याचा परिचय करून दिला. शहरातील विविध भागांतील शाळांमधून तसेच नागरिकांमधूनही या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. स्पर्धेच्या ठिकाणी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

यावेळी बोलताना पद्मशाली सोशल फाउंडेशनचे अमोल गुंडू म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला वाव मिळावा तसेच गणेशोत्सवाच्या सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय पैलूंवर विद्यार्थ्यांसह नागरिकांनी विचारमंथन करावे, या उद्देशाने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता हा उपक्रम यशस्वी झाला असून भविष्यातही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, दातरंगे मळा, नेप्ती नाका जवळ, अहिल्यानगर येथे होणार आहे.

स्पर्धेचे आयोजन यशस्वी करण्यासाठी पद्मशाली सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, अजय लयचेट्टी, अमोल गुंडू, श्रीनिवास बुरगुल, राजेंद्र बुलबुले, मयूर जिंदम आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीनिवास बुरगुल यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश लकशेट्टी यांनी मानले.

# विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी अभियंत्यांनी नवीन संकल्पनावर संशोधन करावे - अरविंद पारगावकर

**डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा संपन्न**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी मध्ये इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) यांच्या सहकार्याने भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रमांसह पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी अरविंद पारगावकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की संशोधन व नाविन्यता हा विकसित भारताचा पाया आहे. अभियंत्यांचे तांत्रिक ज्ञान, अभियांत्रिकी औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदान असते. विकसित भारताचे स्वप्न साकारण्या साठी तरुण व नवीन अभियंत्यांनी नवीन संकल्पनांवर संशोधन करावे.असे आवाहन त्यांनी केले.या स्पर्धेला ८० हून अधिक संघांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे मुख्यअतिथी श्री.राजेश जग्गी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभियांत्रिकी क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञाना सोबत सतत शिकत राहणे, व्यावहारिक ज्ञान आत्मसात करणे, समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे आणि आपल्या कौशल्यांचा समाजोपयोगी कार्यासाठी वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळविण्या पेक्षा ज्ञान, कौशल्य आणि नवोपक्रमाच्या माध्यमातून उत्कृष्ट अभियंता होण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमातील प्रमुख वक्ते मॅन्युफॅक्चरिंग एल अँड टी इलेक्ट्रिकल चे माजी उपाध्यक्ष श्री.अरविंद पारगावकर पुढे म्हणाले साध्य करण्यासाठी गुणवत्ता, शिस्त, सतत सुधारणा, टीमवर्क, समस्या मुळापासून समजून घेणे आणि , व यांसारख्या पद्धतींचा प्रभावी वापर याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्योगातील आपल्या प्रदीर्घ अनुभवातील उदाहरणे देत त्यांनी उत्कृष्टता ही एकदाच साध्य होणारी गोष्ट नसून सततच्या प्रयत्नातून निर्माण होणारी प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले. यावेळी इंजि. भारतभूषण भागवत यांनी अभियंत्यांच्या व्यावसायिक विकासात सारख्या व्यावसायिक संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण व तांत्रिक विषयांवर संशोधनात्मक सादरीकरण केले. सुरवातीला कार्यक्रम समन्वयिका प्रा.सौ.पूजा वैकर यांनी प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले. स्पर्धेचे परीक्षण जी. सी.मोटगी आणि एच. बी. थिगळे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातील विषयाची निवड, तांत्रिक गुणवत्ता, नाविन्यपूर्णता, संशोधनवृत्ती आणि सादरीकरण कौशल्य या बाबींचे परीक्षण करण्यात आले. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जीवनकार्यावर आधारित व्हिडिओ सादर करण्यात आला. प्रा.सौ. प्राजक्ता डोलारे यांनी सादरीकरण स्पर्धेचे स्वरूप व नियम स्पष्ट केले. प्रा.डॉ. प्रतिभा गायके समन्वयिका यांनी सर्वांचे आभार मानले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अभियांत्रिकी व डिप्लोमा कॉलेज च्या २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले. या प्रसंगी जपान देशातर्फ घेतल्या गेलेल्या ४ परीक्षेत उत्तीर्ण झालेली नेहा शिरसाठ व तिला मार्गदर्शन करणाऱ्या प्रा सौ.वैदेही पारनाईक व प्रा.सौ.पूजा वैकर यांचा गौरव चिन्ह देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर, आय. टी. विभागप्रमुख डॉ.दीपक विधाते, प्रा अविनाश पुंड, प्रा.आरती बावणे, तसेच विद्यार्थी प्रतिनिधी वेद भनगे, अजय शिवपुजे, तन्वी थिटे, पल्लवी चव्हाण, प्रांजल निर्मळ, शिवानी कोकाटे, सुशांत मरकड, शुभम अभंग,स्वरूपा व्यवहारे, वैष्णवी घाडगे, श्वेता मुळे, अर्जुन खोसे, अनिरुद्ध पांडे, श्रावणी शेळके, अंजली कापसे,वेदांत आरेकर, ऋतिका बगळे विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. डॉ. विखे फाउंडेशनचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील, संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापूरे, यांनी सर्व अभियंत्यांचेकौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मिनार मस्जिदसमोर बाप्पांची आरती; पैठणमध्ये सर्वधर्मीय एकोप्याचे दर्शन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील नेहरू चौक येथे मिनार मस्जिदच्या प्रवेशद्वारासमोर दरवर्षीप्रमाणे यंदाही गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. दहा ते बारा दिवसांच्या गणेशोत्सवात आरती व पूजेसाठी विविध धर्मीय नागरिक उत्साहाने सहभागी होत असून, या माध्यमातून पैठणच्या सर्वधर्मीय ऐक्याची परंपरा अधोरेखित होत आहे.

गणेशोत्सवाच्या काळात दररोज होणाऱ्या आरतीला परिसरातील नागरिकांची मोठी उपस्थिती असते. गणेशोत्सवाच्या सांगतेनिमित्त आयोजित भंडाऱ्यातही सर्वधर्मीय नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतात. एकत्रितपणे प्रसादाचे भोजन घेतल्यानंतर गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीतही नागरिक उत्साहाने सहभागी होत बाप्पाला आनंदाने निरोप देतात. नेहरू चौकातील हा गणेशोत्सव धार्मिक सलोखा, सामाजिक बांधिलकी आणि सर्वधर्मीय एकोप्याचे उदाहरण ठरत असून, शहरातील नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

# पारनेरच्या न्यायालयीन इमारतीसाठी ४१.२९ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता - आमदार काशिनाथ दाते सर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर येथे नवीन न्यायालयीन इमारत उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने ४१ कोटी २९ लाख ८१ हजार १०४ रुपयांच्या अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय २२ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आला असल्याची माहिती पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

पारनेर येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी यापूर्वी ३०.०७ कोटी रुपयांची मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर सुधारित प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला. या प्रस्तावास आता शासनाने मंजुरी देत प्रकल्पासाठी ४१.२९ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.



या प्रकल्पामध्ये मुख्य न्यायालयीन इमारतीसोबत रेन वॉटर हार्वेस्टिंग, दिव्यांगांसाठी रॅम्प, पाणीपुरवठा व मलनिस्सारण व्यवस्था, भूमिगत पाण्याची टाकी, पंप हाऊस, इमारतीचे दर्शनी भागाचे डिझाइन, विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा, वातानुकूलन, लिफ्ट, , फर्निचर, संरक्षण भिंत, गेट व चौकीदार कक्ष, अंतर्गत रस्ते व पार्किंग, सी.सी. ड्रेन तसेच लँडस्केपिंग व बागबगीचा आदी सुविधांचा समावेश आहे. ''पारनेरच्या न्यायालयीन पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. शासनाने या महत्त्वपूर्ण कामास सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, विधी व न्याय विभागाचे मंत्री अ‍ॅड. आशिष जयस्वाल, जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांसह महाराष्ट्र शासनाचे मनःपूर्वक आभार,'' अशी भावना आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केली.

या निर्णयामुळे पारनेर येथील न्यायालयीन कामकाजासाठी आधुनिक व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार आहे. शासन निर्णयानुसार बांधकाम सुरू करण्यापूर्वी आवश्यक नकाशे व तांत्रिक मंजुरी घेणे तसेच नियमानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे. पारनेरच्या विकासाच्या दृष्टीने न्यायालयीन इमारतीसाठी मिळालेली ही ४१.२९ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

# सर्जनशीलता आणि सृजनशीलता : नेमका फरक काय?– सौ. योगिता अरुण जगताप



शिक्षणाच्या क्षेत्रात सर्जनशीलता आणि सृजनशीलता हे दोन शब्द वारंवार ऐकायला मिळतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या दोन्ही गुणांना महत्त्व दिले जाते. मात्र अनेकदा या दोन संज्ञांचा समान अर्थाने वापर केला जातो. प्रत्यक्षात त्यांच्या अर्थछटांमध्ये सूक्ष्म फरक आहे. हा फरक समजून घेतल्यास विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेचा आणि नव्या निर्मितीचा विकास अधिक परिणामकारकपणे करता येतो.

**सर्जनशीलता म्हणजे काय?**

सर्जनशीलता म्हणजे एखाद्या समस्येकडे किंवा परिस्थितीकडे नेहमीच्या चौकटीबाहेरून पाहण्याची, नवीन कल्पना सुचविण्याची आणि वेगळे उपाय शोधण्याची क्षमता.

उदाहरणार्थ, शिक्षकाने विद्यार्थ्यांना विचारले, ''पाण्याची बचत करण्यासाठी आपल्या शाळेत कोणते उपाय करता येतील?'' एखादा विद्यार्थी पाणी बचतीसाठी नवीन कल्पना मांडतो, दुसरा पोस्टरची संकल्पना सुचवतो, तर तिसरा पाणी वापराचे निरीक्षण करण्यासाठी एखादी नवी पद्धत सुचवतो. या सर्वांमध्ये सर्जनशील विचार दिसून येतो. म्हणजेच सर्जनशीलतेचा संबंध प्रामुख्याने नवीन कल्पना, नवीन दृष्टिकोन आणि समस्या सोडविण्याच्या वेगळ्या पद्धतींशी आहे.

**सृजनशीलता म्हणजे काय?**

सृजनशीलता म्हणजे मनात निर्माण झालेल्या कल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्याची आणि त्यातून काहीतरी नवीन निर्माण करण्याची क्षमता. विद्यार्थ्याने पाणी बचतीची कल्पना मांडल्यानंतर त्यावर आधारित पोस्टर तयार केले, छोटा प्रकल्प तयार केला, पाणी बचतीचे मॉडेल बनविले किंवा जनजागृतीसाठी घोषवाक्ये तयार केली, तर त्या कल्पनेचे सृजनात्मक रूपांतर झाले असे म्हणता येईल.म्हणजेच सृजनशीलतेमध्ये कल्पनेपासून निर्मितीकडे जाण्याची प्रक्रिया अधिक ठळकपणे दिसते.

**सोप्या भाषेत फरक**

दोन्ही संकल्पना एकमेकांशी जवळच्या आहेत. त्यांच्यात स्पष्ट भिंत नाही. तरीही समजण्यासाठी पुढीलप्रमाणे फरक करता येतो

**सर्जनशीलता सृजनशीलता**

नवीन कल्पना सुचविण्याची क्षमता नवीन गोष्ट निर्माण करण्याची क्षमता विचारांमध्ये नावीन्य आणते त्या विचाराला प्रत्यक्ष रूप देते ''आणखी वेगळे काय करता येईल?'' असा विचार ''ही कल्पना प्रत्यक्षात कशी आणता येईल?'' यावर भर कल्पनाशक्ती व विचारप्रक्रियेशी अधिक संबंधित निर्मिती, अभिव्यक्ती व कृतीशी अधिक संबंधित अनेक पर्याय शोधण्यास मदत योग्य कल्पनेतून काहीतरी निर्माण करण्यास मदत

**विद्यार्थ्यांच्या शिक्षणात दोन्हींचे महत्त्व**

शिक्षणाचा उद्देश केवळ विद्यार्थ्यांनी माहिती लक्षात ठेवणे हा नसून त्यांनी विचार करावा, प्रश्न विचारावेत, नवीन कल्पना मांडाव्यात आणि त्या प्रत्यक्षात आणाव्यात, हा आहे.ो उदाहरणार्थ, गणिताच्या तासाला ''आयताचा उपयोग कुठे होतो?'' हा प्रश्न विचारल्यावर विद्यार्थी वेगवेगळी उदाहरणे सांगतात. ही सर्जनशील विचारप्रक्रिया आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांनी उपलब्ध वस्तूंचा वापर करून आयताच्या आकाराचे उपयुक्त मॉडेल तयार केले, तर त्या कल्पनेचे सृजनशील रूपांतर झाले. भाषेच्या तासाला विद्यार्थ्यांना गोष्टीचा शेवट स्वतः तयार करण्यास सांगणे, विज्ञानात टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू तयार करणे, गणितात दैनंदिन जीवनातील समस्येवर नवीन उपाय शोधणे किंवा सामाजिक विषयावर जनजागृतीचे पोस्टर तयार करणेअशा उपक्रमांतून दोन्ही गुणांचा विकास होतो.

**शिक्षकांची भूमिका महत्त्वाची**

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि सृजनशीलतेला वाव देण्यासाठी शिक्षकांनी ''एकच बरोबर उत्तर'' या चौकटीबाहेर जाऊन विद्यार्थ्यांना विचार करण्याची संधी द्यायला हवी.

''तुला असे का वाटते?'', ''याचा दुसरा मार्ग कोणता असू शकतो?'', ''तू यामध्ये काय नवीन करू शकतोस?'', ''ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी काय करता येईल?'' असे प्रश्न विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देतात. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक कल्पनेचे त्वरित मूल्यमापन किंवा नकार देण्याऐवजी त्यांना प्रयोग करण्याची, चुका करण्याची आणि पुन्हा प्रयत्न करण्याची संधी देणे आवश्यक आहे.

**आजच्या काळात या गुणांची गरज**

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात केवळ पाठांतरावर आधारित ज्ञान पुरेसे नाही. नवीन समस्या निर्माण होत आहेत आणि त्यासाठी नवीन उपायांची गरज आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कल्पक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता, निर्णयक्षमता, प्रयोगशीलता आणि नवोन्मेषी दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे.

सर्जनशीलता विद्यार्थ्याला नवीन विचार करायला शिकवते, तर सृजनशीलता त्या विचाराला कृती आणि निर्मितीचे रूप देण्यास प्रेरणा देते.

निष्कर्ष – सर्जनशीलता आणि सृजनशीलता या परस्परपूरक संकल्पना आहेत. एका अर्थाने सर्जनशीलता ही नव्या कल्पनेची सुरुवात आहे, तर सृजनशीलता त्या कल्पनेचे प्रत्यक्ष साकार होणे आहे.म्हणूनच वर्गखोलीत विद्यार्थ्यांना फक्त प्रश्नांची उत्तरे शोधायला शिकवण्याऐवजी नवीन प्रश्न विचारायला, वेगळे विचार करायला आणि आपल्या कल्पनांना प्रत्यक्ष रूप द्यायला शिकवणे ही काळाची गरज आहे.''कल्पना मनात जन्म घेते, विचारांत आकार घेते आणि कृतीतून साकार होतेहीच सर्जनशीलतेपासून सृजनशीलतेकडे जाणारी वाट.''

# ज्ञानज्योती पुरस्काराने प्राचार्य बाळासाहेब खिलारी सन्मानित

**उत्कृष्ट शैक्षणिक कार्याची दखल; सिताराम पाटील खिलारी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**टाकळी ढोकेश्वर –** स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठान संचलित शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी धोत्रे बु. यांच्या वतीने आदर्श शैक्षणिक नेतृत्वाचा गौरव करण्यासाठी दिला जाणारा 'ज्ञानज्योती पुरस्कार २०२६' श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथील प्राचार्य श्री. बाळासाहेब नारायण खिलारी यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल प्रदान करण्यात आला.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. सिताराम पाटील खिलारी (अण्णा) यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी स्वास्थ्यदर्पण प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. प्रशांत शिंदे, सचिव सौ. सोनाली शिंदे, प्राचार्य डॉ. जयदीप पवार, श्री दुर्गादेवी विद्यालयाचे प्राचार्य श्री. आदम शेख, अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सचिव श्री. अमोल ठाणगे, पारनेर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री. भगवान राऊत, तसेच दुर्गादेवी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. सहादू भोंडवे सर यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.


श्री. बाळासाहेब नारायण खिलारी हे टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी असून त्यांनी एम.ए.बी.एड. (हिंदी) हे शिक्षण घेतले आहे. वाचन व गायन हा त्यांचा विशेष छंद आहे. ते १ जानेवारी १९९८ पासून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या संस्थेत कार्यरत आहेत. गेल्या २८ वर्षांपासून त्यांनी इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना हिंदी विषयाचे अध्यापन करून राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रचार व प्रसारासाठी योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शैक्षणिक गुणवत्ता वाढ आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. १ जानेवारी २०२५ पासून श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे पर्यवेक्षक म्हणून त्यांनी कार्यभार स्वीकारला. त्यानंतर १ जून २०२५ पासून याच विद्यालयाच्या प्राचार्यपदी ते कार्यरत आहेत. दीर्घकाळ केलेले अध्यापनकार्य, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीची धडपड आणि प्रभावी शैक्षणिक नेतृत्व यांची दखल घेत त्यांना 'ज्ञानज्योती पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आल्याने अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष मा. रा. ह. दरे साहेब, उपाध्यक्ष मा. डॉ. विवेक भापकर, सचिव मा.अ‍ॅड विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मा. मुकेशदादा मुळे, खजिनदार अ‍ॅड. दिपलक्ष्मी म्हसे मॅडम, माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विश्वस्त मा. नंदकुमार झावरे पाटील साहेब, माजी सचिव जी. डी. खानदेशे साहेब, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे खजिनदार व ढोकेश्वर विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वृंद यांच्या वतीने तसेच विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींकडून प्राचार्य श्री. बाळासाहेब नारायण खिलारी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### कर्मवीरांच्या त्यागातून उभी राहिलेली ज्ञानाची रयत



अहिल्यानगर- २२ सप्टेंबर हा दिवस महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील एका महान व्यक्तिमत्त्वाची आठवण करून देणारा दिवस. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती म्हणजे केवळ एका महान शिक्षणमहर्षीचे स्मरण करण्याचा दिवस नाही, तर शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचे स्वप्न पाहणाऱ्या आणि ते स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेणाऱ्या कर्मयोग्याला अभिवादन करण्याचा दिवस आहे.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्या काळात शिक्षणाची चळवळ उभी केली, त्या काळातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती आजच्या तुलनेत पूर्णपणे वेगळी होती. ग्रामीण भागातील गरीब, शेतकरी, शेतमजूर आणि वंचित कुटुंबांतील मुलांना शिक्षण मिळणे हीच मोठी गोष्ट होती. अशा परिस्थितीत शिक्षण काही मोजक्या लोकांच्या हातात न राहता ते बहुजन समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, हा विचार कर्मवीरांनी कृतीत आणला. स्वतःच्या सुखसोयींचा विचार न करता त्यांनी शिक्षणाचा यज्ञ सुरू केला. हा यज्ञ उभारताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. मात्र ध्येय स्पष्ट होते.''बहुजन समाजातील मुलांच्या हातात शिक्षणाचे सामर्थ्य द्यायचे.''याच ध्येयातून रयत शिक्षण संस्थेचा विस्तार होत गेला. कर्मवीरांनी लावलेले हे छोटेसे रोपटे आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विस्तारलेला विशाल वटवृक्ष झाले आहे. या वटवृक्षाच्या सावलीत अनेक पिढ्यांनी शिक्षण घेतले, जीवन घडविले आणि समाजाच्या विविध क्षेत्रांत आपले योगदान दिले. कर्मवीरांचे कार्य केवळ शाळा सुरू करण्यापुरते मर्यादित नव्हते. विद्यार्थ्यांनी स्वावलंबी व्हावे, श्रमाची प्रतिष्ठा समजावी आणि परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे भविष्य घडवावे, हा त्यांच्या कार्याचा गाभा होता. ''कमवा आणि शिका'' ही संकल्पना त्याच व्यापक विचारातून आकाराला आली. आज आपण मागे वळून पाहतो तेव्हा कर्मवीरांनी केलेल्या त्यागाची खरी उंची लक्षात येते. त्यांनी शिक्षणासाठी केवळ पैसा किंवा साधने उभी केली नाहीत; त्यांनी शिक्षणाविषयी समाजाचा दृष्टिकोन बदलला. गरीब मुलाला शिक्षण मिळू शकते, ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठी स्वप्ने पाहू शकतो आणि श्रमातून ज्ञानाकडे जाणारा मार्ग खुला होऊ शकतो, हा आत्मविश्वास त्यांनी समाजाला दिला. म्हणूनच आजच्या रयत शिक्षण संस्थेकडे पाहताना तिच्या भौतिक विस्ताराबरोबरच तिच्या विचारांचा प्रवासही समजून घेणे आवश्यक आहे.

### नेप्ती नाका येथे 'राष्ट्रनिर्मितीचे तीन आधारस्तंभ' देखाव्याचे उद्घाटन



अहिल्यानगर - गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये सामाजिक प्रबोधनाचे काम होत असते. लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सव सुरू करून ऐतिहासिक, धार्मिक, पारंपरिक सण-उत्सवाबरोबरच समाजप्रबोधनाची चळवळ सुरू केली. या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती झाली आणि नागरिक एकत्रित येऊन विचारांची देवाणघेवाण करू लागले. नवग्रह मित्र मंडळानेही सातत्याने सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक प्रबोधनाचा वारसा जोपासला आहे, असे प्रतिपादन शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी केले. गणेशोत्सवानिमित्त नेप्ती नाका येथे नवग्रह मित्र मंडळ ट्रस्टच्या वतीने 'राष्ट्रनिर्मितीचे तीन आधारस्तंभ' या देखाव्याचे उद्घाटन शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.यावर्षी नवग्रह मित्र मंडळाच्या वतीने 'राष्ट्रनिर्मितीचे तीन आधारस्तंभ' हा देखावा साकारण्यात आला आहे. या देखाव्यामध्ये भारतमातेचे संरक्षण, शिक्षणाच्या माध्यमातून विज्ञानाचा आविष्कार आणि शेतीप्रधान देशाची संकल्पना सादर करण्यात आली आहे. या माध्यमातून देशाप्रती असलेली निष्ठा व प्रेम तसेच देशाच्या प्रगतीचे चित्रण करण्यात आले असल्याचे डॉ. दिलीप टिपरसे यांनी सांगितले.गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम ठरला आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिक एकत्र येतात, विविध विषयांवर विचारांची देवाणघेवाण होते आणि सामाजिक विषयांबाबत जनजागृती केली जाते. नवग्रह मित्र मंडळाने आपल्या देखाव्यांच्या माध्यमातून ही परंपरा पुढे नेण्याचे काम केले असल्याचेही डॉ. टिपरसे यांनी नमूद केले. गणेशोत्सवानिमित्त नवग्रह मित्र मंडळाच्या वतीने साकारण्यात आलेल्या 'राष्ट्रनिर्मितीचे तीन आधारस्तंभ' या देखाव्याचे सादरीकरण पाहण्यासाठी गणेशभक्त मोठ्या संख्येने येत आहेत. भारतमातेचे संरक्षण, शिक्षण व विज्ञान तसेच शेतीप्रधान भारत या तीन विषयांच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीचा संदेश देण्यात आला आहे.

# मराठी राजभाषा कृती समितीच्या जिल्हा सचिवपदी वृषाली कुलकर्णी

**राज्य, जिल्हा व तालुकास्तरावर कृती समित्यांची प्रभावी बांधणी सुरु**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्यामंदिर (प्राथमिक विभाग), सावेडी येथील ज्येष्ठ शिक्षिका सौ. वृषाली प्रसाद कुलकर्णी यांची मराठी राजभाषा कृती समितीच्या अहिल्यानगर जिल्हा सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

मराठी भाषेचा प्रचार-प्रसार व संवर्धन अधिक व्यापक स्वरूपात व्हावे, मराठीला ज्ञानभाषेचा सन्मान मिळावा, मराठी माध्यमाच्या शाळांना बळकटी मिळावी आणि विद्यार्थी, शिक्षक, पालक व समाजामध्ये मराठी भाषेविषयी अभिमान व आत्मीयता निर्माण व्हावी, या उद्देशाने मराठी राजभाषा कृती समितीच्या राज्य, जिल्हा व तालुकास्तरीय निवडीची प्रक्रिया सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून सौ. वृषाली प्रसाद कुलकर्णी यांची जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली.

यावेळी मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानचे संस्थापक अमोल क्षीरसागर यांच्या हस्ते सौ. कुलकर्णी यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुलोचना अमोल क्षीरसागर यांच्या उपस्थितीत त्यांच्या निवडीचा सर्वानुमते ठराव संमत करण्यात आला.

मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्रभर मराठी भाषेच्या जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षा, मराठी भाषा जनजागृती अभियान, शैक्षणिक व साहित्यिक उपक्रम, व्याख्याने, शिक्षक-विद्यार्थी प्रबोधन आणि मराठी माध्यमाच्या शाळांना प्रोत्साहन देत मराठी भाषेच्या संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

जिल्हा सचिव म्हणून वृषाली कुलकर्णी यांच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील शाळा, शिक्षक, विद्यार्थी, पालक, साहित्यिक व सामाजिक संस्थांना मराठी राजभाषा संवर्धनाच्या कार्याशी जोडून 'मराठी बोलू, मराठी शिकू, मराठी जगू आणि मराठी जपू' या भावनेला बळ देण्याचे कार्य अपेक्षित आहे. मराठी भाषेच्या संवर्धनाच्या चळवळीला कुलकर्णी यांच्या शैक्षणिक अनुभवाचा व कार्यतत्परतेचा निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी श्री समर्थ प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर तसेच विद्यालयातील सहशिक्षिका उपस्थित होत्या.

# मोरया युवा प्रतिष्ठानचा गणेशोत्सव जल्लोषात; ढोल पथकाच्या वादनाने दुमदुमला गुलमोहर रोड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** सावेडी येथील गुलमोहर रोड परिसरात मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, परिसरात भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नुकतेच पारंपरिक ढोल पथकाच्या वादनाने बाप्पाची महाआरती करण्यात आली. ढोल पथकाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला आणि भाविकांनी मोठ्या उत्साहात गणरायाचे दर्शन घेतले.

यावेळी गणांत वाद्यपथकाचे स्थिर वादन करण्यात आले. पारंपरिक वाद्यांच्या सुरावटी आणि गणेशभक्तांच्या उत्साहामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. याचबरोबर सत्यनारायण पूजेचेही आयोजन करण्यात आले होते. पूजेनंतर भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. या भंडाऱ्याचा मोठ्या संख्येने भाविकांनी लाभ घेतला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोरया युवा प्रतिष्ठानच्या गणरायाच्या दर्शनासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. महिला, युवक तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.

आमदार संग्राम जगताप यांनीही मोरया प्रतिष्ठानला भेट देऊन गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी उपस्थित भाविकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन मदान, जनक आहुजा, मनोज मदान, हरजितसिंह वधवा, सिमरनकौर वधवा, राजेंद्र कंत्रोड, अमिता कंत्रोड, आशिष गुप्ता, सुमिता वाही, राजू जग्गी, राकेश गुप्ता, विवेक गुप्ता, करण धूप्पड, राजा नारंग, कुमार नवले, सतीश म्हस्के, राहुल डालिमकर, अक्षय पालवे, पृथ्वीराज ढापसे, नितेश जग्गी, आदित्य शिंदे, निलेश दाणे, दिलीप पवार, हर्षल शिरसाठ, प्रदीप पंजाबी, पिंकी मक्कर, अमन वाही, प्रदीप सचदेव, प्रीती सचदेव, राजेश अरोरा, स्मिता अरोरा, अंगद मदान, रेणू मदान, आनंद मुथा, नम्रता मुथा, विक्रम बोर्डावेकर, सुनीता बोर्डावेकर, पौर्णिमा बोर्डावेकर, सिद्धार्थ उपोनी, अनिता गुप्ता, किश शाह, अजय पंजाबी, रूपा पंजाबी, इंजि. रोहिदास सातपुते, स्विटी पंजाबी, डॉ. खन्ना, हरविरसिंग मक्कर, शिवम पवार, जयकुमार रंगलानी, महेश सातपुते, राजेंद्र गवळी, विपुल शाह, मन्नू कुकरेजा, राहुल बजाज, संजय धुप्पड, आशिष गुलाटी, स्नेहा गुलाटी, गीता पस्सी, संगीता पस्सी, अरमान पस्सी, संतोष चौहान, दानेश्वर, सीमा लोणकर, यश दुग्गड, अपर्णा मदान, अर्चना मदान, अभिलाषा मदान, अनिता शर्मा, अनिल शर्मा, मुरलीधर मेहेतानी, अनुमय गुप्ता, अश्विनी गुप्ता, सीमा गुप्ता, कुणाल नवले, सुरेश म्हस्के, अक्षय पालवे, कविता तुपे, यश्री दुगड, आदित्य पावसे, प्रतिभा महामीने, सोहम लोखंडे, रुद्रश शिंदे, स्वरूप शिंदे, शौर्या दाने आदींसह युवक, परिसरातील महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा वाचनालयाच्या वतीने गणरायासमोर 'पुस्तकांचा आरसा' देखावा

**वाचन संस्कृती वाढविण्यासह नव्या युवा वाचकांना प्रेरणा देण्याचा उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम सुरू असताना विद्येची देवता असलेल्या गणरायाच्या समोर विचारांची व वाचनाची वृद्धी व्हावी, तसेच समाजामध्ये वाचन संस्कृती अधिक रुजावी, या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने 'पुस्तकांचा आरसा' हा आकर्षक देखावा सादर करण्यात आला आहे. गणरायाच्या सान्निध्यात पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या देखाव्याला वाचक तसेच रसिक नगरकरांचा प्रतिसाद मिळत आहे.

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात विराजमान झालेल्या गणरायासमोर अध्यक्ष डॉ. राजेंद्र ठाकूर व प्रमुख कार्यवाहक विक्रम राठोड यांच्या संकल्पनेतून हा देखावा साकारण्यात आला आहे. वाचनाची आवड निर्माण करण्याबरोबरच पुस्तकांमधून विचारांची समृद्धी कशी होते, याचा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. वाचन संस्कृती वाढविणारे विविध सुविचार देखाव्यामध्ये ठळकपणे मांडण्यात आले असून, ते वाचकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

गणरायाच्या मूर्तीसमोर विविध लोकप्रिय व वाचनीय पुस्तके आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने वाचनालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाला पुस्तकांचे महत्त्व जाणवावे आणि वाचनाची आवड अधिक दृढ व्हावी, असा प्रयत्न करण्यात आला आहे. दररोज असंख्य वाचक जिल्हा वाचनालयाला भेट देत असतात. या वाचकांचे वाचन अधिक वृद्धिंगत करण्याबरोबरच नवीन युवा वाचक निर्माण होण्यासाठी 'पुस्तकांचा आरसा' हा देखावा समाजाला प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास संचालक किरण आगरवाल व शिल्पा रसाळ यांनी व्यक्त केला.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक व वैचारिक संदेश देणारा उत्सव व्हावा, या उद्देशाने जिल्हा वाचनालयाने पुस्तकांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचा हा उपक्रम राबविला आहे. मोबाईल व डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापराच्या काळात पुस्तके आणि वाचनाची सवय यांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा देखावा विशेष ठरत आहे. विशेषतः युवा पिढीने पुस्तकांकडे वळावे आणि नियमित वाचनातून आपली विचारशक्ती व ज्ञानसमृद्धी वाढवावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.

'पुस्तकांचा आरसा' हा देखावा रसिक नगरकरांनी आवर्जून पाहावा, असे आवाहन जिल्हा वाचनालयाचे उपाध्यक्ष श्री. दिलीप पांढरे, श्री. अनंत देसाई, खजिनदार तनवीर खान, सहकार्यवाह राहुल तांबोळी तसेच सर्व सदस्य, निमंत्रित सदस्य, ग्रंथपाल अमोल इथापे, सहग्रंथपाल नितीन भारतात व कर्मचारी वृंद यांनी केले आहे.

# डॉन बॉस्को शाळेतील विद्यार्थी.. अबोली.. कथेत झाले मंत्रमुग्ध



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉन बॉस्को मराठी प्राथमिक विभाग अहिल्या नगर ने , कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन साठी आज २२ सप्टेंबर २६ रोजी निमंत्रित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका शिल्पा मॅडम होत्या. विद्यार्थ्यांसमोर मनोगत व्यक्त करताना बाळासाहेब देशमुख म्हणाले विद्यार्थ्यांनी मोबाईल बाजूला सारत पुस्तक वाचनामध्ये मग्न झाले पाहिजे. पुस्तके आपल्याला तारतील, घडवतील. पुस्तक वाचन, जडणघडण मधूनच डॉ. अब्दुल कलाम , साने गुरुजी, स्वामी विवेकानंद , अनेक लेखक यासारखे थोर विचारवंत तयार झाले. संपूर्ण जगतामध्ये त्यांनी आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटवला. सदर कार्यक्रमात कथाकथनकार श्री बाळासाहेब देशमुख यांनी अबोली ही कथा सादर केली. आजी आजोबांचा शेवटचा मित्र म्हणजे त्यांची नातवंडे. तर नातवंडाचा पहिला मित्र म्हणजे आजी आजोबा. यांच्या भावविश्वावर भाष्य करणारी कथा . सकस कथानक, देहबोली, आवाजातील चढ उतार, उत्कृष्ट शब्द फेक याद्वारे कथा सर्व विद्यार्थी ,पालक ,शिक्षकांना मंत्रमुग्ध करून गेली. संमेलन मध्ये लक्षवेधी ठरली.आजी आजोबांच्या सहवासात, नातवंडांवरती जे जे संस्कार होतात. त्यातून एक सकस, राष्ट्राला तारणारी पिढी तयार होते. हल्लीची मुले, हुशार, चाणाक्ष व जिज्ञासू आहेत. आजी आजोबांच्या सुसंस्काराने चांगली जडणघडण करत, आपले आयुष्य घडवतात. हा लक्षवेधी संदेश विद्यार्थ्यांना मिळाला.बाळासाहेब देशमुख यांचे आजवर अहिल्यानगर जिल्ह्यात ५०० कथाकथन प्रयोग , शाळा, कॉलेज, ज्येष्ठ नागरिक संघ येथे पूर्ण झालेले आहेत. शिवाय विविध आकाशवाणी केंद्रावर ,१२० कथा प्रसारित झालेल्या आहेत. राज्यस्तरीय साहित्य संमेलनमध्ये त्यांचे आजवर ३५ कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत.. मुख्याध्यापिका शिल्पा मॅडमच्या शुभ हस्ते कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचा सन्मान करण्यात आला.

# तपोवन हडको येथे मोफत सर्वरोग निदान आरोग्य शिबिर संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ तसेच आयुष्मान भारत जन आरोग्य योजना अंगीकृत रुग्णालय यांच्या समन्वयातून राबविण्यात येत असलेल्या श्रीगणेशा आरोग्याचा या आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत तपोवन हडको येथील ढवण वस्ती परिसरात मोफत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

द साल्व्हेशन आर्मी इव्हँन्जलीन बूथ हॉस्पिटल आणि तपोवन हडको येथील राजा अष्टविनायक गणपती मित्र मंडळ, ढवण वस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने हे आरोग्य शिबिर घेण्यात आले.. या शिबिरामध्ये बूथ हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली. यामध्ये डॉ. मीना फुके, जनरल फिजिशियन आणि डॉ. वृषाली महांडुळे, त्वचारोग तज्ज्ञ यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. शिबिरात ६१ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. तसेच नागरिकांची मोफत रक्त तपासणी करण्यात आली आणि आवश्यक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर सुरेंद्र चोपडे, ऊर्जिता सोशल फाऊंडेशनच्या संध्या मेढे, सामाजिक कार्यकर्ते अनिल ढवण आणि प्रवीण साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनपर भाषणात बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर सुरेंद्र चोपडे यांनी शिबिरात तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांना आवश्यक असल्यास बूथ हॉस्पिटलमध्ये कमीत कमी खर्चात पुढील उपचार उपलब्ध करून देण्यात येतील, असे सांगितले. नागरिकांनी आरोग्याची नियमित तपासणी करून आजारांचे वेळेत निदान व उपचार करून घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. या आरोग्य शिबिराच्या आयोजनासाठी विजय कसबे, सामाजिक कार्यकर्ते आनंद नायडू, सौ. शोभा चव्हाण, आयडियल हेल्पिंग हँड नर्सेस, आरोग्य मित्र शरद कोंडा यांचे सहकार्य लाभले. तसेच गणेश मंडळाचे कार्यकर्ते मुकेश आंबेकर, सौरभ म्हस्के आणि बूथ हॉस्पिटलचे अमित पठारे यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राजा अष्टविनायक गणपती मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरज जगधने, खजिनदार सौरभ म्हस्के, उपाध्यक्ष निखिल नलगे यांच्यासह अतुल टाके, मुकेश आंबेकर, अजिंक्य पवार, अमित शेख, अभिषेक गवळी, रोहित कोडम, अंकुश रोकडे, सविता कोडम, सुरेखा जगधने, रुकसाना शेख, आशा नलगे, भारती उषा कोयल आणि सोनी रोकडे यांनी सहकार्य केले. आरोग्य तपासणीसारख्या उपक्रमांमुळे परिसरातील नागरिकांना त्यांच्या आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन मिळून वेळेवर निदान, उपचार आणि आरोग्यविषयक जनजागृतीला चालना मिळते, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# नंदनवन मित्र मंडळाचा 'युगत मांडली' जिवंत देखाव्याचे उत्साहात उद्घाटन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** टिळकरोडवरील नंदनवन मित्र मंडळाचे संस्थापक सदस्य दत्ता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या 'युगत मांडली' या जिवंत देखाव्याचे उद्घाटन नरसिंग पटेल आणि नगरसेविका सुवर्णा जाधव यांच्या हस्ते झाले. संस्थापक सदस्य दत्ता जाधव, संजय तात्या जाधव, अध्यक्ष विशाल जाधव, उपाध्यक्ष कुणाल गवळी आणि खजिनदार विशाल लोलगे आदी मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित या देखाव्यात विविध ऐतिहासिक प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले असून, नागरिक आणि गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

नगरसेविका सुवर्णा जाधव म्हणाल्या, ''छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित 'युगत मांडली' हा जिवंत देखावा अत्यंत प्रेरणादायी आणि प्रभावी आहे. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी इतिहासातील प्रसंग जिवंतपणे सादर करून नव्या पिढीसमोर महाराजांचे शौर्य, पराक्रम, स्वराज्याची संकल्पना आणि जनकल्याणाची भूमिका उभी केली आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये इतिहासाविषयी अभिमान निर्माण होतो, तसेच मुलांना आपल्या संस्कृतीची आणि परंपरेची ओळख होते. नंदनवन मित्र मंडळ सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक उपक्रमांद्वारे सातत्याने उल्लेखनीय कार्य करत आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन कलाकारांचा आणि कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवावा.''

दत्ता जाधव म्हणाले, ''नंदनवन मित्र मंडळ वर्षभर सामाजिक कार्यात अग्रेसर असते. दरवर्षी मंडळातर्फे नाविन्यपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक देखावे सादर केले जातात. यंदा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित 'युगत मांडली' हा जिवंत देखावा नगरकरांसाठी खुला करण्यात आला आहे. परिसरातील ज्येष्ठांच्या हस्ते या देखाव्याचे उद्घाटन करण्यात आले.''

या उपक्रमासाठी संजय तात्या जाधव, अध्यक्ष विशाल जाधव, उपाध्यक्ष कुणाल गवळी आणि खजिनदार विशाल लोलगे यांचे सहकार्य लाभले. ऋषी जाधव, सूरज जाधव, आदेश जाधव, राज जाधव, अतुल जाधव, संतोष जाधव, ओंकार जाधव, अवधूत जाधव, ओंकार शिंदे, अभिजित गोंधळे, श्रीकांत सरोदे, ओंकार शेळके, विहांत पटवा, विकी हिरणवळे, अक्षय गोंधळे, स्वप्नील घार्टी, विशाल गायकवाड, गणेश जाधव, अभि जाधव, राम डमाले, शेखर तांबे, संजय लोढा, नरसिंग पटेल, अरुण जाधव, अशोक जाधव, नारायण जाधव, बाळासाहेब जाधव, योगीराज पाडोळे, पुरुषोत्तम पटेल, प्रशांत भोगे, विश्राम पटेल, मांजी पटेल, सोमनाथ नजान, बडे भाई शेख, सूरज साबळे, देवेंद्र आगरकर, विनायक नेवसे, चंद्रकांत पाडळे, अभि पाडोळे , बाळासाहेब हिरणवळे, नरेंद्र सत्रे, गणेश फुलसौंदर, आदेश जाधव, राज जाधव आदी उपस्थित होते.



नवग्रह प्रतिष्ठान मित्र मंडळ ट्रस्ट ने राष्ट्रनिर्मितीचे तीन आधारस्तंभ हा देखावा केला आहे


नेता सुभाष तरूण मंडळ ट्रस्टने आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे (छाया - उदय जोशी)


मंगलगेट येथील अजिक्य तरुण मंडळाने मेरा मान जोकर हा देखावा सादर केला (छाया - राजू खरपुडे)


दाळमंडइ तरूण मंडळ योग तपस्वी श्री चांगदेव अणि ज्ञानेश्वर महाराजांची भेट. ( छाया- उदय जोशी)

# डीसीएसएमएच ॲपद्वारे शेतकऱ्यांना स्वत: पीक नोंदणीची सुविधा

**शेतकरी बांधवांनी आपल्या शेतातील पिकांची अचूक व वेळेत नोंदणी करून घ्यावी – सभापती प्रा. राम शिंदे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रात पीक नोंदणीची प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यासाठी केंद्र शासनाच्या मोबाईल ॲपद्वारे शेतकरी स्तरावरून स्वतः पीक नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिनांक ११ सप्टेंबर २०२६ पासून ही सुविधा कार्यान्वित करण्यात आली असून, राज्यातील शेतकरी बांधवांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपल्या शेतातील पिकांची नोंदणी वेळेत करून घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले आहे.



केंद्र शासनाच्या डिजिटल क्रॉप सर्व्हे अंतर्गत महाराष्ट्रात पीक नोंदणीची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. दिनांक ११ ऑगस्ट २०२६ पासून सहाय्यक स्तरावर पीक नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे. त्याचबरोबर आता दिनांक ११ सप्टेंबर २०२६ पासून शेतकऱ्यांना स्वतःच्या मोबाईलवरून पीक नोंदणी करता येणार आहे. फारमर आयडीच्या माध्यमातून नोंदणी शेतकरी बांधवांनी ॲपमध्ये आपला प्रविष्ट करून आपल्या शेतातील पिकांची नोंदणी करता येईल. संबंधित शी संलग्न असलेल्या सर्व शेतजमिनींची पीक नोंदणी या सुविधेद्वारे करता येणार आहे. त्यामुळे पीक नोंदणीसाठी संबंधित यंत्रणेकडे जाण्याची आवश्यकता कमी होऊन शेतकऱ्यांना घरबसल्या आपल्या मोबाईलद्वारे ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

अचूक पीक नोंदणीचे महत्त्व पीक नोंदणी ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. शेतातील पिकांची अचूक नोंद उपलब्ध असल्यामुळे विविध शासकीय योजना, अनुदाने, पीकविमा, नुकसानभरपाई तसेच विविध शासकीय सेवांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येक शेतकरी बांधवाने आपल्या शेतातील पिकांची अचूक, योग्य आणि वेळेत नोंदणी करावी. पीक नोंदणी करताना आपल्या शेतातील प्रत्यक्ष पिकांचीच माहिती नोंदवावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांच्या अध्यापनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी उपयोग – सौ. योगिता अरुण जगताप



आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. मोबाईल, इंटरनेट, डिजिटल साधने यांच्याबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय शिक्षणक्षेत्रातही वेगाने प्रवेश करत आहे. मुळे माहिती मिळविण्याची, शिकण्याची आणि शिकविण्याची पद्धत बदलत आहे. योग्य नियोजन आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली चा वापर केल्यास विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक सोपे, मनोरंजक, वैयक्तिक आणि परिणामकारक होऊ शकते.

विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक अध्ययन
प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची क्षमता, गती आणि आवड वेगवेगळी असते. काही विद्यार्थ्यांना एखादी संकल्पना लगेच समजते, तर काहींना त्याच संकल्पनेसाठी अधिक उदाहरणे किंवा सरावाची आवश्यकता असते. च्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार प्रश्न, उदाहरणे, सरावपत्रिका आणि स्पष्टीकरणे तयार करता येतात. त्यामुळे एकच पद्धत सर्वांसाठी या पारंपरिक पद्धतीऐवजी वैयक्तिक अध्ययनाला चालना मिळते.

**अवघड संकल्पना सोप्या भाषेत**
गणितातील अपूर्णांक, गुणोत्तर, भूमिती, विज्ञानातील विविध संकल्पना किंवा इंग्रजी व्याकरण यांसारखे विषय काही विद्यार्थ्यांना अवघड वाटतात. च्या मदतीने एखादी संकल्पना सोप्या भाषेत, उदाहरणांसह, टप्प्याटप्प्याने किंवा दैनंदिन जीवनाशी जोडून समजावून सांगता येते. विद्यार्थ्यांना एखादे उत्तर समजले नाही तर ते पुन्हा वेगळ्या पद्धतीने स्पष्टीकरण मागू शकतात.

**प्रश्ननिर्मिती आणि सराव**
शिक्षक च्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या इयत्ता आणि अध्ययनस्तरानुसार विविध प्रकारचे प्रश्न तयार करू शकतात. बहुपर्यायी प्रश्न, रिकाम्या जागा, बरोबर-चूक, परिस्थितीजन्य प्रश्न, गणिती कोडी तसेच उच्चस्तरीय विचारक्षमतेवर आधारित प्रश्न तयार करता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक सराव आणि विविध प्रकारच्या प्रश्नांचा अनुभव मिळतो.

**भाषिक कौशल्य विकास**
मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांच्या अध्यापनातही उपयुक्त ठरू शकते. शब्दसंग्रह वाढविणे, वाक्यरचना, व्याकरण, संवादलेखन, गोष्टलेखन, परिच्छेदलेखन आणि भाषांतर यासाठी चा उपयोग करता येतो. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या मजकुरातील चुका ओळखून त्यामागील नियम समजून घेण्यासाठीही सहाय्यक ठरू शकते.

**सर्जनशीलतेला चालना**
म्हणजे केवळ प्रश्नांची उत्तरे देणारे साधन नाही. त्याचा वापर विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी करता येतो. एखाद्या विषयावर गोष्ट तयार करणे, संवाद लिहिणे, प्रकल्पाची कल्पना मांडणे, शैक्षणिक पोस्टरची संकल्पना तयार करणे, प्रश्नमंजुषा बनविणे अशा अनेक उपक्रमांमध्ये चा वापर करता येतो.

शिक्षकांसाठीही उपयुक्त
मुळे केवळ विद्यार्थ्यांनाच मदत होत नाही, तर शिक्षकांचेही काम सुलभ होऊ शकते. पाठयोजना, कृतीआधारित अध्यापन, प्रश्नपत्रिका, सरावपत्रिका, मूल्यमापनाचे निकष, प्रकल्पाच्या कल्पना आणि शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी शिक्षक चा सहाय्यक म्हणून उपयोग करू शकतात. त्यामुळे शिक्षकांचा वेळ वाचून तो विद्यार्थ्यांशी संवाद, मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष कृतींमध्ये अधिक प्रभावीपणे वापरता येतो.

मात्र एआयचा वापर विवेकाने हवा
एआयचा वापर करताना काही महत्त्वाच्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. ने दिलेली प्रत्येक माहिती अचूक असेलच असे नाही. त्यामुळे माहितीची पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी कडून थेट उत्तर घेऊन ते पाठ करण्यापेक्षा उत्तर कसे मिळाले, त्यामागील विचार काय आहे आणि त्याचा स्वतःच्या शब्दांत उपयोग कसा करता येईल, यावर भर दिला पाहिजे.
तसेच विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती, छायाचित्रे किंवा संवेदनशील माहिती अनोळखी साधनांमध्ये देताना काळजी घेणे आवश्यक आहे. हे शिक्षकाला पर्याय नसून शिक्षकाचा सहाय्यक आहे, ही भूमिका स्पष्ट असणे गरजेचे आहे.

सह शिक्षण ही भविष्याची दिशा
आजच्या विद्यार्थ्यांना केवळ माहिती पाठ करणारे विद्यार्थी न बनवता विचार करणारे, प्रश्न विचारणारे, समस्या सोडविणारे, सर्जनशील आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणारे नागरिक बनविणे ही शिक्षणाची गरज आहे. या प्रक्रियेत योग्य पद्धतीने वापरल्यास ते एक प्रभावी शैक्षणिक साधन ठरू शकते.
शिक्षकांचे अनुभवजन्य ज्ञान, विद्यार्थ्यांची जिज्ञासा आणि चे तांत्रिक सामर्थ्य यांचा योग्य समन्वय साधला तर शिक्षण अधिक आनंददायी, प्रभावी आणि विद्यार्थी-केंद्रित होऊ शकते. म्हणूनच भविष्यात प्रश्न शिक्षणात येणार का? हा नसून चा योग्य, सुरक्षित आणि सर्जनशील वापर शिक्षणात कसा करायचा? हा असणार आहे.
तंत्रज्ञान हातात असणे महत्त्वाचे नाही; त्याचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला, विचारांना आणि सर्जनशीलतेला दिशा देणे महत्त्वाचे आहे.

(पान १ वरून)

# स्थायी समिती सभेत ३३ रस्त्यांसह विविध विकासकामांना मंजुरी

दर वाढले आहेत. प्रस्ताव तयार करताना डांबराचा दर प्रतिटन ४९ हजार रुपये होता. आता हा दर सुमारे ७० हजार रुपये प्रतिटन झाला आहे.

बाबासाहेब वाकळे यांनी महानगरपालिका किती दर देणार, अशी विचारणा केली. त्यावर पारखे यांनी डांबराच्या दराबाबत महिन्यातून दोन वेळा पत्रक येते. प्रत्यक्ष काम करताना असलेला दर विचारात घेऊन त्यानुसार देयके केली जातील, असे स्पष्ट केले. दोन ठेकेदार असून वार्षिक निविदा आहेत. तसेच काही प्रभागांमधील कामे असून त्यांनाही दरातील तफावत द्यावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सभापतींनी विसर्जन मार्गावरील रस्त्याचे काम झाले आहे का, अशी विचारणा केली. त्यावर पारखे यांनी बाजारपेठेतील कामे झाल्याचे सांगितले.

बाबासाहेब वाकळे यांनी निविदा घेऊनही वेळेत कामे पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांना भविष्यात नवीन निविदा भरता येणार नाही, अशी तरतूद करण्याची मागणी केली. त्यावर पारखे यांनी संबंधित ठेकेदारांना नोटिसा देण्यात आल्या असून कामाला विलंब झाल्यास दंड आकारण्यात येत असल्याचे सांगितले.

यावर सभापतींनी कामांना वेळेचे बंधन घालण्याचे निर्देश देत कामे निर्धारित वेळेतच पूर्ण झाली पाहिजेत, यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे आदेश दिले.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत जनजागृती निविदेच्या विषयावरही सभेत चर्चा झाली. सभापतींनी या विषयाची माहिती मागितली. शरद जाधव यांनी घनकचरा व्यवस्थापन, कचरा विलगीकरणाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती, विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती तसेच इतर उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. डोअर-टू-डोअर जनजागृतीसाठी एका घरामागे ३० रुपये खर्च प्रस्तावित असल्याची माहिती त्यांनी दिली.

सभापती पै. सुभाष लोंढे आणि बाबासाहेब वाकळे यांनी जनजागृती करताना संबंधित नगरसेवकांना विश्वासात घेण्याची सूचना केली. किती घरांपर्यंत जनजागृती पोहोचली हे कसे समजणार, अशी विचारणा त्यांनी केली. त्यावर शरद जाधव यांनी जीपीएस अहवाल घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

मनोज कोतकर यांनी कचरा डेपोमध्ये कचऱ्याचे मोठमोठे ढीग असल्याचा मुद्दा उपस्थित केला. हे ढीग कशासाठी करण्यात आले आहेत, अशी विचारणा त्यांनी केली. त्यावर शरद जाधव यांनी कचऱ्यावर प्रक्रिया केली जात असल्याचे सांगितले.

मनोज कोतकर आणि सुरेश बनसोडे यांनी कचऱ्याचा देखावा केला आहे का, असा सवाल उपस्थित केला. केडगावातून कचऱ्याचे ढीग डोंगरासारखे दिसतात. केडगाव आणि बुरुडगाव परिसरातील नागरिकांना त्याचा त्रास होत असल्याचे त्यांनी सभेत निदर्शनास आणून दिले.

सभापती पै. सुभाष लोंढे आणि बाबासाहेब वाकळे यांनी कचरा प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता किती टन आहे, दररोज किती कचरा येतो आणि त्यापैकी किती कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जाते, याची माहिती मागितली.

विभाग प्रमुख प्रशांत रामदिन यांनी आपण नवीन असल्याने संबंधित माहिती घेत असल्याचे सांगितले. त्यावर सभापती आणि बाबासाहेब वाकळे यांनी तुम्ही कधी कचरा डेपोवर जाऊन पाहणी केली आहे का, तेथील परिस्थिती काय आहे, याची माहिती द्या, अशी विचारणा केली.

मनोज कोतकर यांनी शहरातील ओढे-नाले सफाईचे किती काम झाले, याची माहिती सभेत मागितली. अनिकेत बल्लाळ यांनी कामाची माहिती देताना केडगावातील दौंड रोडवर नालेसफाईचे काम सुरू करण्यात आले होते. या कामाची निविदा २८ लाख रुपयांची होती. मात्र, तरतूद संपल्याने काम बंद झाल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मनोज कोतकर आणि सुरेश बनसोडे यांनी काम अर्धवट राहिल्यामुळे पावसाच्या काळात नागरिकांच्या घरात पाणी शिरल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवाल उपस्थित केला. संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली.

सभापतींनी निधी संपल्यानंतर उर्वरित कामासाठी प्रस्ताव का करण्यात आला नाही, अशी विचारणा केली. त्यावर बल्लाळ यांनी वाढीव तरतुदीचा प्रस्ताव तयार करण्यात येत असून प्रलंबित काम पूर्ण करून घेतले जाईल, असे सांगितले. सभापतींनी तातडीने हे काम मार्गी लावण्याचे निर्देश दिले.

# माळीवाडा तरुण मंडळाच्या वटसावित्री देखाव्याचे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उद्घाटन

या देखाव्याला भेट देऊन मंडळाच्या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असे त्यांनी सांगितले.

वटसावित्रीच्या देखाव्यामध्ये सावित्री-सत्यवानाच्या कथेतील विविध प्रसंग साकारण्यात आले असून, वटवृक्षाचे महत्त्व आणि सावित्रीच्या निष्ठेचे दर्शन घडविण्यात आले आहे. देखाव्याची मांडणी, प्रकाशयोजना आणि सजावट यामुळे परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले जात आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच तरुणांकडून देखाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धेबरोबरच संस्कृती आणि परंपरेचा संदेश पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा मंडळाचा प्रयत्न असल्याचे यावेळी दिसून आले.

उद्घाटनप्रसंगी हिंदुत्ववादी नेते सागर बेग, नगरसेवक अविनाश घुले ,मंडळाचे अध्यक्ष निलेश खरपुडे, उपाध्यक्ष पै मयूर भापकर, पै गणपत चेडे , आशिष खंदारे, बजरंग भूतारे, विष्णुपंत मस्के, अक्षय आंबेकर, गणेश कोल्हे, अभिषेक खंदारे, शुभम खंदारे, श्रीकांत आंबेकर, शुभम भापकर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. गणेशोत्सवाच्या कालावधीत नागरिकांनी वटसावित्री देखाव्याला भेट देऊन संस्कृती आणि परंपरेचा संदेश जाणून घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले.

# खाकी वर्दीतील संवेदनशीलता!

आणि आपुलकी पाहून विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा गजर करत व व्हिक्ट्री साइन ( ) दाखवून आपला आनंद व्यक्त केला.

यावेळी विद्यार्थ्यांनी संजय येनपुरे यांना विविध विषयांवर थेट प्रश्न विचारले, ज्यांची त्यांनी अत्यंत मार्मिक आणि सोप्या भाषेत उत्तरे दिली.

स्पर्धा परीक्षा आणि करिअरबाबत मोलाचे मार्गदर्शन:
कर्मवीरांच्या शैक्षणिक विचारांचे स्मरण करत त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची सविस्तर माहिती दिली. वर्ग ४ च्या पदांपासून ते वर्ग १ च्या पदांपर्यंतच्या विविध परीक्षांचे स्वरूप, तसेच राज्य पातळीवरील व केंद्र स्तरावरील () परीक्षांविषयी मार्गदर्शन केले. ''आयुष्यात काय व्हायचे आहे हे आधीच निश्चित करा आणि नियोजनबद्ध अभ्यास करा,'' असा सल्ला त्यांनी दिला. कार्यक्रमादरम्यान एका विद्यार्थिनीने अभ्यासाच्या नियोजनावर मांडलेल्या विचारांचे त्यांनी विशेष कौतुक केले. मान्यवरांची उपस्थिती:
कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ॲड. संदीप वर्पे, प्रा. रवींद्र जायभाय, प्रा. जगदीश सोनवणे आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल सदस्य किरण कडू यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी शेवगाव उपविभागीय पोलीस उपअधीक्षक नीरज राजगुरु, नाशिक आयजी वाचक पोलीस निरीक्षक विलास पुजारी, सोनई पोलीस ठाण्याचे सपोनि अनिल मोरे, स्कूल कमिटीचे अध्यक्ष सुभाष टेमक, सूर्यभान फुलसौंदर, मुळा कारखान्याचे संचालक चंद्रकांत टेमक, नामदेव कंक, संजय कंक, सुहास टेमक, कर्णासाहेब औटी, पानेगावचे माजी सरपंच हौशाबापू जंगले, माजी उपसरपंच डॉ. जयवंतराव गुडधे, कैलास बाचकर, राजेंद्र टेमक, भाऊसाहेब राजगुरु, नानासाहेब पुंड, आशुतोष माकोणे, ग्रामीण पत्रकार संघटनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब नवगिरे, केंद्रीय पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कमलेश गायकवाड, दिगंबर माकोणे, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयाचे प्राचार्य एस. बी. बनकर, पर्यवेक्षक वाय. एस. पठाण यांच्यासह सर्व शिक्षकवृंद, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. विठ्ठलराव देवखिळे यांनी केले, तर सूत्रसंचालन दुर्गा बिडवे मॅडम यांनी अत्यंत उत्कृष्टरीत्या पार पाडले.

# खून करून पसार झालेला आरोपी कल्याणमधून जेरबंद । स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

शाखेला आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलिस अंमलदार फुरकान शेख, शामसुंदर जाधव, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, रोहित मिसाळ, प्रताप देवकाते, दीपक जाधव आणि अरुण मोरे यांचे पथक तयार केले.

गुन्हा घडल्यानंतर आरोपी श्रीगोंदा, दौंड, पुणे आणि मुंबई परिसरात सतत ठिकाणे बदलून पोलिसांना चकवा देत असल्याचे तपासात समोर आले. दरम्यान, २३ सप्टेंबर रोजी हरीष काळे हा कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. माहितीची खात्री करून पोलिस पथकाने कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचला. आरोपी तेथे येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर हरीष काळे याला पुढील तपासासाठी नगर तालुका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नगर तालुका पोलिस करीत आहेत.